ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.IX/March 2012;pp.1-4

Research Paper

# *मानवधिकार आणि बालकामगार*

*प्रा. एम. एस. ताकतोडे*
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान
महाविद्यालय, मंगरूळपिर, जि. वाषिम

## *प्रस्तावना :–*

आज आधुनिक युगात मानव हा आपल्या मुलभुत गरजा भागवित असतांनाच ज्या औद्योगिकीकरणामुळे मानवाच्या गरजा भागविल्या जातात त्याच औद्योगिकीकरणामुळे मानव हा विज्ञान तंत्रज्ञानात विकसीत होत असतांना आपण बघतो. मानव हा समाजशिल प्राणि आहे हे सत्य असले तरी तोच मानव काही क्षेत्रात इतरासाठी घातक ठरत गेला. औद्योगिक काळामध्ये मानवाने स्वतःचे रक्षण किंवा संरक्षण करण्यासाठी अणुचाचण्या, ॲटमबॉब, क्षेपणास्त्रे, मोबाईल इ.चा शोध लावला. हा शोध मानवजातीला विध्वंसाकडे घेउन गेला आणि त्याचा परिणाम म्हणुण जगात जी दोन युदधे झाली त्याचीच परिणीती होय. निर्सगतः स्चातंत्र घेउन जन्माला आलेला हा मानव नागरिक या युदधामुळे आपले स्वातंत्र गमावुन बसला आहे. यामध्ये तो कुटुंबाबरोबरच स्चतःच्या राष्ट्रालाही गमावुन बसला आहे.

या सर्व बाबीचा सखोल अभ्यास करून जागतिक पातळीवरील नेंत्यांनी कोण्त्याही राष्ट्रातील नागरिकांवर अन्याय होउ नये आणि वसाहतवाद पुन्हा निर्माण होउ नये यासाठी प्रत्येक राष्ट्राला स्चतःचे अधिकार मिळवुन देण्यासाठी पाउल उचलण्याची गरज आहे असे आग्रहाने सांगितले. त्यामधूनच सयुक्त राष्ट्रसंघाची घोषणा पुढे आली. आणि स्त्री पुरूष समानता अधिकार, महिला सक्ष्मीकरण कायदा, शिक्षणाचा कायदा, बालकामगार कायदा इ. कायदे समोर आले. आज ग्रामीण व काही शहरी भागातील झोपडपटटी परिसरातील किंवा दुर्बल समाज घटकामध्ये मुला मुलीना श्शाळेत किंवा शिक्षणासाठी पाठविले जात नाही. तर कामावर पाठविले जाते. याची दखल घेउन मानवधिकाराने बालकामगाराच्या शोषणावर, त्याच्या कामावर नियंत्रण यावे याबाबत कायदा करण्यात आला. संपुर्ण भारतभर आणि विशेषतः महाराष्ट्र राज्यात याची अंमलबजावणी सुरू झाली. मानवधिकाराच्या अनुषंघाने बालकामगार कायदा कसा आहे ? . बालकामगारांना फायदेषिर आहे किंवा नाही ?, हा कायदा आल्यामुळे बालकामगार व्यवस्थेमध्ये बदल होतील काय ?. या सर्व प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी मानवधिकार व बालकामगार हा विषय शोध निबंध लिहण्यासाठी निवडलेला आहे

### *कायद्याची पार्ष्वभुमी*

सयुक्त राष्ट्रसंघाच्या ग्रामसभेच्या दि. 10 डिसे. 1948 च्या अधिवेशनात मानवी हक्काची जागतिक घोषणा करण्यात आली. यामध्ये भारताबरोबरच जगातील एक तृतीअंश देशांनी या जाहीर नाम्यावर स्वाक्षरी केल्या. यामुळे एखाद्या नागरिकाला त्याच्या देशात मानवी हक्काचे उल्लघन होत आहे असे वाटले तर तो नागरिक मानवी हक्क समितीकडे दाद मांगु शकतो. असे यात सांगितले आहे. जागतिक पातळीवर तयार केलेल्या मानवी हक्काचे महत्व लक्षात घेउन भारतातही असा स्चतंत्र कायदा निर्माण करण्याची गरज भासली. याच पार्ष्वभुमीवर भारतातील नागरिकांना मिळालेल्या मानवी अधिकाराचे उल्लंघन होउ नये यासाठी 1993 मध्ये विशेष कायदा करण्यात आला. कायदयाची अंमलबजावणी होते किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी राष्ट्रीय मानवधिकाराची स्थापना करण्यात आली. 2006 पासुन देशभरात या कायदयाची अंमलबजावणी सुरू झाली. राष्ट्रीय स्तराप्रमाणेच प्रत्येक राज्यासाठी मानवधिकार आयोग स्थापन करण्यात आले.

सर्व मानसे जन्मतःच समान आहेत. जिवनाचा स्वतंत्र आणि सुखाचा उपभोग हे निसर्गतःच बहाल केलेले आहेत. तिला भाषनाचा, लेखनाचा,समानतेचा, संघटन करण्याचा व शिक्षणाचा हक्क व अधिकार आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणतीही व्यक्ती जात, घर्म, लिंग, भाषा प्रांत, वंश इत्यादीच्या आधारावर भेदभाव करणार नाही.

भारतातील राज्यघटनेने जगण्यापासुन विचार ,व्यावसाय, शिक्षण, धर्म, स्वात़ंत्र प्रत्येक नागरिकाला दिले आहे. मानवाला मिळालेल्या या अधिकारांना मानवधिकार म्हणतात.

### *बालकामगार*

'मुले ही देवाघरची फुले', किंवा 'मुले ही राष्ट्राची संपत्ती आहे' किंवा आजची मुले ही उद्याचे नागरिक आहेत' हे विचार बालकाचे महत्व व मोठेपणा विषद करतात. हे विचार प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने आणि खासकरुन काही कारणांमुळे वाममार्गाला गेलेल्या अपचारी बालकांची आणि अनाथ, परित्यक्त व उपेक्षित असलेल्या बालकांची योग्य प्रकारे काळजी घेण्यासाठी, त्यांचे सरंक्षण करण्यासाठी, त्यांच्यावर उपचार करण्यासाठी तरतूद करण्याकरिता तसेच त्यांच्या विकासविषयक गरजा पुरविण्याकरिता व त्यांच्या हिताच्या बाबतीत दिल्या जाणाऱ्या अभिनिर्णयामध्ये केल्या जाणाऱ्या व्यवस्थेमध्ये त्यांना हितकारक असलेला दृष्टिकोन स्वीकारण्यासाठी आणि त्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याकरिता तरतूद करण्याच्या दृष्टीने एक सर्वसमावेशक कायदा करणे आवश्यक असल्याचे भारत सरकारला इष्ट वाटल्याने बाल न्याय अधिनियम 2000 हा कायदा दिनांक 30 सप्टेंबर, 2000 रोजी प्रख्यापित करण्यात आला आहे. या कायद्यामध्ये, बालकांसाठी न्यायिक प्रबंध करणे, त्यांच्या विकासात्मक गरजांकडे लक्ष देण्याच्या उद्देशाने बालयंत्रणा बनविणे, त्यांचे वय निर्धारित करणे, त्यांची प्रकरणे लवकरात लवकर निकालात काढणे, समाज, स्वयंसेवी संस्था व स्थानिक संस्थांच्या मदतीने त्यांचे सामाजिक व मानसिकदृष्ट्याा पुनर्वसन करणे, त्यांच्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने बालगृहे, विशेष गृहे, आधार गृहे, संरक्षक गृहे, बाल कल्याण समित्या, बालन्याय मंडळे इत्यादीची स्थापना करणे यासाठी तरतूद केली आहे. भारतातील इतर सामाजिक समस्याच्या तुलनेत विचारवंताचे, समाजशास्त्रज्ञाचे, मानसशास्त्रज्ञाचे, दुर्लक्ष झालेली समस्या म्हणजे बालकामगारांची समस्या होय.

### *बालकामगारांची व्याख्या :*

भारतामध्ये अठरा वर्षावरील व्यक्तीला कायद्याने सज्ञान समजले जाते. तथापी, शारीरिक कष्ट, मोलमजुरीच्या संदर्भात हीच वयाची अट चौदा वर्ष इतकी आहे. भारतीय घटनेनुसार (24 वा परिच्छेद) ''चौदा वर्षाखालील कुणाही मुलाला कोणत्याही कारखान्यात किंवा अन्य कष्टप्रद कामावर ठेवता येणार नाही.'' इतरही अनेक कायद्यामध्ये अशाच प्रतिबंधक तरतुदी आहेत. उदा. 1948 च्या कारखाना कायद्यातील कलम 67 नुसार चौदा वर्षाखालील मुलांना कारखान्यात कामावर ठेवण्यास प्रतिबंध केला आहे. तरीही भारतात उद्योग व्यवसायाचे असे क्षेत्र क्वचितच असेल की जेथे मुलांना मजुरी करायला लावली जात नाही.

होमर फोन्स यांच्या मते, '' बालकांचा संपुर्ण 'शारिरीक विकास आणि किमान 'शैक्षणिक पातळीच्या संधी यामध्ये अडथळा निर्माण करणारे बालकाकडुन केले जणारे कोणतेही काम म्हणजे बालकामगार होय''

दि कमिटी ऑन चाईल्ड लेबरने बालकामगारांची केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे – ''बाल लोकसंख्येतील असा भाग की जो स–वेतन किंवा विनावेतन काम करतो त्याला बाल–कामगार म्हणावे''

### *बालकामगार समस्येचे स्वरुप :*

भारताच्या सर्व राज्यांमध्ये ग्रामीण तसेच शहरी विभागातही वेगवेगळे व्यवसाय, व्यापार, उदयोगधंदे, हॉटेल्स, कारखाने, मळे, खाणी इ. ठिकाणी मोठया प्रमाणात बाल कामगार काम करत आहेत.दिल्ली, उत्तरप्रदेश, तमिळनाडू, महाराष्ट्र इ. राज्यातील कारखान्यातून काम करणारी मुले ही शारीरिकदृष्ट्या खालावत असल्याचे काही अभ्यासकाचे निरीक्षण आहे. बरगड्या आत जाणे, शरीराला पोक येणे, कृष शरीर, निस्तेज डोळे अशा काही खुणा त्यांच्या शरीरावर दिसतात. कारखान्यात असुरक्षिततेच्या कारणांपुढे होणारे अपघात त्यातून येणारी अंशतः किंवा पूर्ण दुर्बलता किंवा अन्य कारणामुळे ही मुले ऐन विसीपंचविसीतच काम करायला अपात्र होतात. ज्या बालकामागारांची अल्पवेतनामध्ये बारा–बारा तासाच्या दिवसपाळ्याा, रात्रपाळ्याा करुन अशी परिस्थिती होते त्या बालकामगारांना मात्र ते अकार्यक्षम होताच निर्दनपणे कामावरुन काढले जाते. उत्तरप्रदेशातून 6 ते 11'' वर्षे वयोगटातील मुलांची एक पाहणी करण्यात आली. या पाहीणीतील 83

**Please cite this Article as :*प्रा. एम. एस. ताकतोडे* , *मानवधिकार आणि बालकामगार*: Golden Research Thoughts (March ; 2012)**

म्हणजे 33.5 टक्के मुली कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कामात गुंतलेल्या होत्या. उत्तर प्रदेशातील गालिचा विणण्याच्या कारखान्यातील 25 टक्के कामगार ही मुले आहेत, तर मिर्झापूर येथील कारखान्यातून 20,000 कामगारांपैकी 8000 कामगार मुले आहेत. काश्मिरमध्ये भरतकाम करावयाच्या व्यवसायामध्ये लहान मुलांची संख्या प्रचंड असून त्यांना एकाग्रचित्ताने, एकाच स्थितीत दीर्घकाळ बसावे लागते, परिणामी पाठीला पोक येतो आणि दृष्टीदोष निर्माण होतो. तर सूरत आणि परिसरात असलेल्या हिऱ्यांना पैलू पाडण्याच्या कारखान्यात पण बाल कामगारांची अशीच परिस्थिती आहे.

बाल कामगारांच्या समस्येशी निगडीत आणखी एक गंभीर समस्या म्हणजे बाल–वेठबिगार होय. आंध्रप्रदेशातील वेठबिगारांपैकी 29.0 टक्के ही 16 वर्षाखालील आहेत, तर हाच आकडा कर्नाटकामध्ये 10.3 टक्के , तामिळनाडूंत 8. 7 टक्के इतका आहे. वयाच्या पाचव्या वर्षापासूनच या मुलांची वेठबिगारी सुरु झाल्याचे काही पाहण्यांवरुन स्पष्ट झाले आहे. भारतातील बऱ्याच राज्यातून (उदा. बिहार, ओरिसा, महाराष्ट्र इ) कर्जाची परतफेड करण्यासाठी आठ–दहा वर्षाच्या मुली जमीनदाराच्या, सावकाराच्या किंवा मालकाच्या घरी मोलकरीण म्हणून ठेवण्याची पद्धत आहे. तिच्या मोलातून हे कर्ज फेडले जाते. अर्थात त्यात कित्येक वर्ष जातात. काही आदिवासी जमातीत तर पिढ्याानपिढ्याा अशा प्रकारे कर्ज फेडले जाते.

चहाच्या मळ्याातून 12 वर्षाखालील मुलांना काम करायला बंदी आहे. पण मळेकर इथेही कौशल्याने मुलीचा उपयोग करुन घेतात. आपल्या आईचे जेवन घेऊन आलेल्या मुलींना 'आईच्या कामात मदत' करायला सांगितले जाते. खाणीमध्ये सुद्धा मुलांचा असाच उपयोग करुन घेतला जातो. खाणीमध्ये फोडलेला कोळसा खाणीतून तळातून वर भूपृष्ठावर आणण्याच्या कामासाठी लहान मुलांना कामाला लावले जाते. बालकामगारांच्या समस्येच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखा एक मुद्दा म्हणजे खाजगी, असंघटित क्षेत्रामध्ये बालकामगारांची समस्या गंभीर आहे. याच क्षेत्रामध्ये बालकामगारांचे मोठ्याा प्रमाणावर आर्थिक, शारीरिक, लैगिंक शोषण होते. या क्षेत्रातील मुलांना कामगार कायद्याचे सरंक्षण नसल्याने त्याचे शोषण करणे, कायद्यातून पळवाटा काढणे सोयीचे असते. उद्योगधंद्याच्या हजेरीपत्रकावर बाल कामगारांची नावेच न लिहणे, वय वाढवून लिहिणे, वेतन कमी देणे, यासारख्या प्रकारांनी मुलांचे शोषणच केले जाते. हे मानवधिकाराचे उल्लघंन नाही काय ?

***बालकामगार समितीने (1979) या संदर्भात नोंदलेली निरीक्षणे :***

या समितीच्या मते मुलांच्या अंगी आज्ञाधारकता, पडेल ते काम करण्याची वृत्ती, अगतिकता, शरणागतता इ. गुण असतात. मुले संघटना करत नाहीत. त्रास देत नाहीत, ती गरजू असतात शारिरिक दृष्ट्याा चपळ, चलाख असतात. मुलांना शिक्षा करता येते. या सर्व कारणामुंळे मुलांना मजुरीस लावणे मालकांच्या सोयीचे असते. बालकामगार समितीने (1979) या संदर्भात नोंदलेली

***निरीक्षणे पुढीलप्रमाणे :***

1 पालक निरक्षर आणि अज्ञानी असण्याचा संबंध दारिद्रयाशी, बेकारीशी आहे. कनिष्ठ सामाजिक आर्थिक

स्तरातच निरक्षरतचेचे प्रमाण जास्त आढळते अलिगढ येथील कुलूपाच्या कारखान्यात काम करणाऱ्या

80 प्रतिशत बाल कामगारांचे आई वडील अशिक्षित असल्याचे आढळले.

2 कुटुंबातील सदस्यांची संख्या जास्त असणे आणि त्याप्रमाणात कुटुंबाच्या गरजा भागविण्याइतपत उत्पत्र नसणे हे ही एक बालमजुरीचे एक कारण आहे. मुलांची संख्या जितकी जास्त तितके कुटूंबाचे उत्पत्र जास्त असाही गैरसमज काही निरक्षर व अज्ञानी कुटुंबात असतो. अलिगढ येथील पाहणीत बहुसंख्य बालकामगार हे मोठ्याा कुटुंबाचे सदस्य असल्याचे आढळले. कौटुबिंक ताण–तणाव पालकांचे विभक्त राहणे, पालकांनी त्याग करणे, छळणे, आजारपण, कमावत्या कर्त्या व्यक्तीचा मृत्यु, शारिरिक व्यंग इ. या व्यतिरिक्त मुलांची स्वावलंबी होण्याची ओढ, अभ्यास किंवा शाळेची नावड, चैनी वृत्ती, तात्कालिक किंवा प्रासंगिक गरज, व्यसनांना लागणारा पैसा मिळविणे, इ. कारणे ही बालमजुरीस जबाबदार आहेत

***बालमजुरी निर्मूलनार्थ उपाय वा तरतुदी –***

आपल्या भारतीय समाजामधून बालकामगार प्रथेचे निर्मूलन करायचे असेल तर त्यासाठी एकात्मिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत सामाजिक न्यायाबाबत म्हटले आहे की, प्रत्येक डोळयातून निघालेले अश्रु मिटणे आणि शोषण थांबविणे आवश्यक आहे. लहानलहान मुलांना शोषण मुक्त करण्यासंबंधी संविधानात प्रावधान आहे.

1. अनुच्छेद 24 मध्ये 14 वर्षा खालील मुलांना कोणत्याही कारखान्यात, खाणीत अथवा धोकादायक उद्योगात काम करण्यास बंदी आहे. मुलांच्या आरोग्याचे रक्षण व्हावे हाच यामागील उद्देश होय.
2. कोवळया मुलांचे शोषणापासून रक्षण व्हावे म्हणून घटनेतील ''नीती निर्देशक तत्वे'' या प्रकरणात ही जबाबदारी शासनावर टाकण्यात आली आहे.
3. अनुच्छेद 39(इ) मध्ये बालकामगारांच्या बाबतीत राज्यांनी पाळावयाची निर्देशक तत्वे दिलेली आहेत.
4. अनुच्छेद 39(क) नुसार बालपण शोषणमुक्त ठेवण्यासाठी संरक्षण देणे आवश्यक ठरते
5. भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 नुसार संविधान लागू झाल्यापासून 10 वर्षाच्या आत 14 वर्षा खालील

प्रत्येक बालकाला मोफत आणि अनिवार्य शिक्षण उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न राज्य शासनाने करावेत असे आहे. संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार 14 वर्षा पर्यंत सक्तीचे मोफत शिक्षण दिले गेले तर बालकामगार समस्येला आपोआपच आळा बसू शकेल. हे शिक्षण देत असतांना त्या मुलांचा कल पाहून त्यांना व्यावसायिक शिक्षण दिले गेले तर बेरोजगारी व अकुशलकामगार यांचा प्रश्न सुटण्यास फार मोठया प्रमाणात मदत होईल

भारत सरकारने एका विशिष्ट वयापेक्षा कमी वयाच्या मुलांना रोजगाराकरिता लावले जावू नये म्हणून अनेक कायदे केले आहेत. 2 सप्टेंबर 1990 ला बाल हक्कांबाबत युनोची परिषद झाली. याप्रसंगी मुलांच्या हक्काबाबत आंतरराष्ट्रीय कायदा बनविण्यात आला. भारत सुध्दा या कायद्याशी बांधील आहे. सन 1901 ते 1987 या काळात बालमजूरी प्रतिबंधासंबंधीचे एकूण 22 कायदे अस्तित्वात आले. परंतु बालश्रमिक समस्येचे समाधान केवळ कायदे पारीत करुन होऊ शकत नाही.

जेव्हा या समस्येबद्दल समाजात अधिक लोकजागृती होईल व ही सामाजिक अनिष्ट प्रथा समूळ नष्ट करण्यास सरकारला सामाजिक संस्था व नागरिक सहयोग देतील तेव्हांच ही समस्या मिटू शकेल. सरकारी प्रयत्नांबरोबरच स्वयंसेवी संघटनांनी सुध्दा ही समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावा.

***समारोप –***

मानवधिकराचे उल्लंघन होणार नाही तसेच बालमजुरांचे पूनर्वसन आणि निर्मूलनासाठी समाजातील विविध घटकांचा सहभाग असल्याशिवाय उद्दिष्ट प्राप्ती होऊ शकणार नाही. त्यासाठी शासनाची भूमिका सर्वाधिक महत्वाची आहे. बालमजुरी पुनर्वसन व निर्मूलन ही लोक चळवळ बनली पाहिजे. यात सर्वाधिक महत्वाची भूमिका स्वयंसेवी संस्था संघटना बजावू शकतात. लोकजागृतीसाठी अनेकविध कार्यक्रम सातत्याने संगठीतपणे आयोजन करणे व शासकीय योजना कार्यान्वीत करण्यास सहकार्य करणे या बाबी स्वयंसेवी संस्थांकडून अपेक्षित आहेत. राजकीय पक्षांनी सुध्दा मानवी हक्काकडे तसेच बालमजूरी निर्मूलन कार्यक्रमाकडे एक अत्यावश्यक कार्यक्रम म्हणून पाहिले पाहिजे.बालकामगार ही दुष्ट प्रथा नष्ट करुन लहान बालकांच्या सर्वांगीण विकासात समाजाने हातभार लावावा याशिवाय समाजातील विद्वांन व विचारवंत मंडळीनी याप्रश्नी प्रबोधनाची भूमिका घेतली तर ही चळवळ पूढे जाण्यास एक चांगला आधार तयार होऊ शकतो. यामुळे बालकामगारांचे पालक व मालक दोघेही प्रबोधीत होऊ शकतात. बालकामगार प्रथा नाहिशी व्हावी यासाठी अनेक प्रयत्न होत आहेत. पण हा सुटा प्रश्न नाही. असंघटित प्रौढ कामगारांच्या प्रश्नातून तो उद्भवलेला आहे. असंघटित क्षेत्रातील किमान वेतनाची पायमल्ली, रोजगााराची अशाश्वती, असुरक्षितता आणि अस्थैर्य हेच बालकामगार प्रथेच्या मुळाशी आहे. अपुऱ्या आणि अनिश्चित रोजगारामुळे घरातील सर्व माणसं कामासाठी बाहेर पडतात आणि छोटी मोठी जोड देवून कसेबसे घर चालवतात. बालकामगार प्रथा नष्ट करणे एकांगी मोहिमेतून काहीच साधणार नाही. मूळ रोगावर उपचार व्हावयास हवेत. असंघटित प्रौढ कामगारांचे प्रश्न मार्गी लागले तरच या मोहिमांना काही अर्थ प्राप्त होईल बालश्रमिकांच्या रोजगाराची स्थिती सुधारणे आणि दुसऱ्या बाजूने बालश्रमिक निर्माण होणार नाही यादृष्टीने प्रयत्न करणे अशी दुहेरी उपाययोजना आवश्यक आहे. पंरतू त्या करिता गरज आहे ती एकात्मिक सामाजिक प्रयत्नांची आणि ते प्रयत्न प्रामाणिकपणे राबविण्याची.

***संदर्भ सूची***

1. इंगळे व्हि.एस. मानवी अध्किाराचा ऐतिहासीक आढावा. अल्फा पब्लीकेशन नांदेड
2. जोशी आर.पी. ,मानव अधिकार व कर्तव्य अभिनव प्रकाशन नांदेड
3. अरूण चतुर्वेदी,संजय लोढा, 'भारत मे मानव अधिकार' पंचशील प्रकाशन, जयपुर, प्र. आ. 2005
4. राष्टीय मानव अधिकार आयोग रिपोर्ट, 2004–05.
5. राष्टीय मानव अधिकार आयोग वेबसाईट,
6. श्री गोजमे मच्छिंद्र – भारतातील बाल कामगार समस्या
7. ॲड श्री श्री.नि.सबनीस – बालकांबाबत न्याय अधिनियम 1986
8. पाटील,लिला, बालहक्क, मुलच जेव्हा बोलु लागतात, ग्रथाली प्रकाशन, मुबंई, 2006,

विविध लेख – Souvenir, UGC Sponsored State level Seminar Protection of Human Right- Adarsha Sci, J.B. Arts & Birla Comm. College Dhamangaopn Rly Dist. Amravati.

**Please cite this Article as :***प्रा. एम. एस. ताकतोडे , मानवधिकार आणि बालकामगार* **: Golden Research Thoughts (March ; 2012)**